कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात इचलकरंजी येथे अप्पर तहसिल कार्यालय स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक प्राफेब-२०१८/ VIP १०१/प्र.क्र.७३/ म-१०
मंत्रालय मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई- ४०००३२.
दिनांक: १३ सप्टेंबर २०१९

वाचा:- विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.मह-३/नैआ/कावि/६५९/१८, दि.१७ जुलै २०१८

प्रस्तावना:-

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्याचा भौगोलिक दृष्टया विस्तार मोठा आहे. सदर तालुक्यातील इचलकरंजी शहरातील जनतेला न्याय देण्याच्या दृष्टीने व तेथे शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील इचलकरंजी येथे अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील इचलकरंजी येथे अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्यास व त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे पद मंजुरीस व अन्य अनुषंगिक बाबीस प्रस्तुत शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यमान हातकणंगले तहसिल प्रशासन बळकट करण्याच्या दृष्टीने अप्पर तहसिलदार, इचलकरंजी यांच्या नवीन कार्यालयासाठी खालील २ पदे नियमित वेतनश्रेणीवर मंजूर करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर पदे ही सध्याच्या त्या- त्या संवर्
गाचा एक भाग राहतील.

अ.क्र	पदाचे नाव	वेतनश्रेणी (रु.)	मंजूर पदाची संख्या	एकूण	पदभरतीचा मार्ग
१	अप्पर तहसिलदार	१५,६००-३९,१००- ग्रेड पे- ५,०००/-	१	१	नियमित नियुक्ती
२	लिपिक-टंकलेखक	५,२००-२०,२००- ग्रेड पे - १,९००/-	१	१	प्रतिनियुक्ती स्वरुपात
		एकूण	२	२	

२. कोल्हापूर जिल्ह्यातील तहसिलदार कार्यालय, हातकणंगले तसेच, अप्पर तहसिलदार कार्यालय इचलकरंजी यांचे कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे महसुली मंडळे व गावे राहतील.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	महसुली मंडळे	एकूण महसुली गावे
१	तहसिलदार, हातकणंगले	एकूण मंडळे - ६ १) हातकणंगले, २)वडगाव, ३)वाठार तर्फे वडगाव, ४)हर्ले, ५) कुंभोज व ६) शिरोली	४२
२	अप्पर तहसिलदार, इचलकरंजी	एकूण मंडळे - ४ १) इचलकरंजी, २) कबनूर, ३) रुई व ४) हुपरी	२०

३. कोल्हापूर जिल्ह्यातील तहसिलदार, हातकणंगले तसेच अप्पर तहसिलदार, इचलकरंजी यांच्या कार्यक्षेत्रातील महसूल मंडळांतर्गत तलाठी साझे व त्यामध्ये अंतर्भूत होणाऱ्या गावांची यादी प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे स्तरावर करण्यात यावी.

४. अप्पर तहसिलदार, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांचे प्रतिवेदन अधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, कोल्हापूर हे काम पाहतील.

५. अप्पर तहसिलदार, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांना प्रस्तुत शासन निर्णयान्वये कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १३ पोटकलम (३)अन्वये प्राप्त अधिकारानुसार, तहसिलदार हातकणंगले यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्ती अप्पर तहसिलदार, इचलकरंजी यांना, त्यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रापुरत्या प्रदान करण्याबाबत स्वतंत्रपणे अधिसूचना निर्गमित करण्यात येईल.

७. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील इचलकरंजी येथे अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याकरिता येणारा खर्च "मागणी क्र. सी-१, २०५३ - जिल्हा प्रशासन, ०९३(०१) जिल्हा आस्थापना, (०१)(०२) आयुक्त, पुणे, (२०५३ ००६४)" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व तो सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. मंजूर तरतूद अपुरी पडत

असल्यास वाढीव तरतूदीची मागणी करावी व ते शक्य नसल्यास पूरक मागणीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

८. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.८६/आपुक, दिनांक ०७.०२.२०१९ व नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत असून, सदर अप्पर तहसिलदार कार्यालयासाठी आवश्यक पदांचा आढावा घेऊन आवश्यक्तेनुसार सदर पदांच्या मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव फेब्रुवारी २०२० नंतर उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१९०९१३१५१०३५६९१९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVIRAJ VISHNU PHALLE

Digitally signed by RAVIRAJ VISHNU PHALLE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=d1a28181e23383c4e20fc8d5ff3d1c5505f086ea0b1eee531142b2aeec83a590, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=bea42246bc0bcf44a3792edbf80cc8f17c935de2c6b145c96db4be6a8a381506, ou=REVENUE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAVIRAJ VISHNU PHALLE
Date: 2019.09.16 17:05:16 +05'30'

(रविराज फल्ले)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-४०००३५.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
७. अप्पर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
८. अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
१०.अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

११.प्रधान सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

१२.प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

१३.विभागीय आयुक्त, पुणे.

१४.जिल्हाधिकारी, कोल्हापूर

१५.उपविभागीय अधिकारी, हातकणंगले, जि. कोल्हापूर

१६.तहसिलदार, हातकणंगले, जि. कोल्हापूर

१७.अप्पर तहसिलदार, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

१८. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर

१९.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२, कोल्हापूर

२०.कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (कार्यासन / ई-३/ई-७/ ई-८/ ई-९/ ई-१०/ ब-१/ ज-८ /ज-५ (अ))

२१.वित्त विभाग (का. विसू-१/ अर्थसंकल्प -६/ व्यय-९/ आ.पु.क.), मंत्रालय, मुंबई

२२.महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने

२३.निवड नस्ती-कार्यासन म-१०